# कृतिपत्रिका २

## मराठी प्रथम भाषा –०१

वेळ : ३ तास एकूण गुण : ८०

कृतिपत्रिकेसाठी सूचना :–

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी(सूचना,निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही.तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग –५ उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गदय विभागातील प्र.१ (इ)अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता ,नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग –1 : गदय

1. (अ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (7 )

1) वैशिष्ट्ये लिहा. 2


अ) लेखकाच्या घरची कपिली गाय–

ब) गाईचे दुध –

आमच्या घरी एक गावरान गाय होती. तिला आम्ही कपिली म्हणायचो. एका आड एक वेताला तरी खोंड ती नक्कीच द्यायची. त्यामुळं दावणीला कायम कपिलीचीच बैलं असायची. कपिली दूधही भरपूर द्यायची. आमचे वडील किंवा काका धार काढायला निघाले, की ग्लासं घेऊन आमचा मोर्चा गोठ्यात. गाईनं पान्हा सोडला, की वासरू आखडायचं न् चरवीतल्या दुधाच्या धारांचं संगीत ऐकत चरवी भरण्याची वाट बघायची. चरवी भरली, की पुन्हा वासरू सोडायचं न् ग्लास घेऊन लायनीत उभं राह्यचं. तिथंच मग ते धारोष्ण दूध आमच्या ग्लासात यायचं आणि ते उबदार दूध मिश्या येईपर्यंत पीत राह्यचं. दुध तिथंच संपवून घरात यायचं. राहिलेली अर्धी चरवी घरात आली, की म्हातारी ढाळजंतनं सोप्यात अवतरायची.

आम्हांला गोठ्यातच दूध मिळण्यावर आजीचा कटाक्ष असायचा. आजीनं सगळ्यांना कामाच्या वाटण्या करून दिलेल्या. कुणी किती दिवस भाकरी करायच्या, कुणी धुणं धुवायचं, कालवण कुणी करायचं, भांडी कुणी घासायची हे सगळं ठरलेलं असायचं आणि आठवड्यानं प्रत्येकीचं काम रोटेशनप्रमाणे बदललं जायचं. प्रत्येकीला प्रत्येक काम आलंच पाहिजे यावर आजीचा भारी कटाक्ष. येत नसेल तिला शिकवायची; पण कामातनं कुणाची सुटका नसायची. भाकरी करपल्या की करणारणीला लाखोली. सरपण नीट नसलं, की गड्यांची फजिती.


**2.काय ते सांगा** **2**




**3) स्वमत:– तुमच्या घरामध्ये कामांची विभागणी कोण करते आणि कशी ? ते सविस्तर लिहा.** 3

1 . (आ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (7 )

1 ) आकृतिबंध पूर्ण करा. 2




कडवट उग्र वासाचे करंजाचे झाडही सबंध फुलले आहे. करंजाच्या फुलांचे रूप अलौकिक असते. अगदी नखाएवढी कळी; करंजीच्याच आकाराची, पांढरी, हिरवी; पण फूल उमलले की ती निराळे दिसते. आत एक निळी–जांभळी नाजूक सुंदर कळी आणि तिच्या डोकीवर अर्धवर्तुळ अशी पांढरी टोपी. जणूकाही टोपडे घातलेला बालघनश्यामच या फुलांच्या रूपात अवतरला आहे. रस्त्यावर पडलेला या फुलांचा खच फार रमणीय दिसतो.चैत्रातल्या पर्ण शोभेचे आणि फळशोभेचे वर्णन आंब्या–फणसाशिवाय पूर्ण होणार नाही. वसंताशी पौषाअखेरीपासूनच मोहोरून सहकार करणारे हे आंब्याचे झाड. लांबलचक देठांना लागलेले कैऱ्यांचे हिरवे गोळे वाऱ्याबरोबर झोके घेत असताना किंवा पोपट किंवा कावळे त्या पाडाला लागल्या आहेत की नाहीत ते पाहण्याकरिता त्यांना चोचींनी प्रहार करतात, तेव्हा मोठी मौज दिसते. गावाबाहेरच्या झाडांतून कोकिळांचे कूजनही बहुधा याच झाडांवर चालत असते. कैऱ्या जून झालेल्या असतानाच एकीकडे पाने झडत असतात;पण झाड रूक्ष असे कधीच दिसत नाही. चैत्रात याही झाडाला पालवीचे घोसच्या घोस लागतात आणि कैऱ्यांबरोबर तेही झोके घेतात.

२) योग्य जोड्या जुळवा 2

| अ गट | ब गट |
|---|---|
| १)वसंत ऋतूला सहकार करणारे झाड | अ) कावळा आणि पोपट |
| २)लांबलचक देठांना झोके घेणाऱ्या | ब) आंबा |
| ३) आंब्याच्या झाडावर कूजन करणारी | क) कैऱ्या |
| ४)पिकलेल्या कैरीवर चोचीने प्रहार करणारे | ड) कोकिळा |

३)स्वमत – तुमच्या आवडत्या वृक्षाविषयीच्या तुमच्या आठवणी लिहा. 3

## अपठित गद्य

1 .(इ ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (4 )


(1) उत्तर लिहा : 2

i )फुलांकडे कोणत्या भावनेने पाह्यला हवे

ii ) फुले म्हणजे निसर्गाची कोणती अभिव्यक्ती आहे असे लेखक म्हणतो .

फुले कोणाला आवडत नाहीत? ती सर्वानाच आवडतात. कोणाला ती पुजेसाठी हवी असतात तर कोणाला गजरे वा वेणीसाठी हवी असतात. पण फुल विक्रेते यांच्याकडे त्या भावनेने कोणी पाहत नाही. फुले शक्यतो वेलीवर किंवा फुलझाडांवर राहू द्यावीत. ती गळून न पडली तर गोळा करावी. पारिजातकाचा सडा आपण पाहत असतो. वेलीवरची फुले कोमेजण्याची वेळ जाणून घेतली व त्यापूर्वी काही तास ती तोडली तर फुलांच्या दृष्टीने ते न्यायाचे होईल. फुलांचा विचार असा भावनात्मक पातळीवरुन करू नये,असे अनेकाना वाटेल पण: फुलांची कोमलता भावनाना स्पर्श करणारी असते. फुले निसर्गाचे भावकाव्य असते. फुले तशी कोणाचीच नसतात तरी पण ती सर्वांचीच असतात . रंग,रूप,गंध यांची उधळण करून आपले जीवन रसपूर्ण,अर्थपूर्ण ,भावपूर्ण करण्याचे काम ती मूकपणे करत असतात.

(2 ) पुढील आकृतिबंध पूर्ण करा. : 2



## विभाग –2 : पद्य

**प्रश्न 2(अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** गुण (8)

1) चौकटी पूर्ण करा. 2

अ. उमेदीने जगण्याला लागणारे– [ ]

ब. खोटी नसणारी– [ ]

खोद आखी थोडसे
खाली असतचे पाणी
धीर सोडू नको,
सारी खोटी नसतात नाणी.

घट्ट मिटू नये ओठ
गाणे असते गं मनी
आर्त जन्मांचे असते
रित्वा गळणाऱ्या पानी.

मूठ मिटून कशाला
म्हणायचे भरलेली
उघडनू ओंजळीत
घ्यावी मना ली तळी.

झरा लागेलच तेथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडेसे !

**2) (i) कवितेच्या आधारे खालील विधाने योग्य की अयोग्य ते लिहा** 2

अ) नवनिर्मिती वर विश्वास ठेवा. --

ब) यशाचा विजयोत्सव करा. --

**3) काव्यसौन्दर्य** 2

`मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली उघडून ओंजळीत

घ्यावी मनातली तळी`

या काव्यपंक्तीतील आशय सौंदर्य स्पष्ट करा.

**4 ) काव्यसौन्दर्य** 2

`आर्त जन्माचे असते रित्या गळणाऱ्या पानी` या ओळींमधील अर्थ तुमच्या भाषेत लिहा.

**प्रश्न(2) (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **गुण (4 )**

i ) भरतवाक्य ii ) तू झालास मूक समाजाचा नायक

1. प्रस्तुत कवितेच्या कवीचे /कवयित्रीचे नाव लिहा.... 1
2. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश 1
3. कविता आवडण्याची किंवा न आवडण्याची कारणे लिहा. 2

**प्रश्न (2) (इ) खाली दिलेल्या काव्यपंक्ती चे रसग्रहण करा.** **गुण (4 )**

झरा लागेलच तिथे

खोद आणखी जरासे उमेदीने जगण्याला

बळ लागते थोडेसे

## विभाग –3 : स्थूलवाचन

**प्र. 3 खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. :** **गुण (6 )**

(1) गिरिजा कीर यांच्या 'गोष्ट एका माणसाची' या शीर्षकाची यथार्थता पाठाच्या आधारे स्पष्ट करा. 3

(2) रेखा मिश्रा यांचे कार्य पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा. 3

i)मुले घरातून पळून येण्याची कारणे

ii) रेखाजींचे प्रयत्न

(3) व्युत्पत्ती म्हणजे काय ते सांगून भाषाभ्यासाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. 3

## विभाग –4 : भाषाभ्यास

**प्र. 4 . अ )व्याकरण घटकावर आधारित कृती :** **गुण (8 )**

1) समास : 2

खालील तक्ता पूर्ण करा :

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| ------<br>भाजीपाला | महान असे राष्ट्र<br>------------ | -----------<br>----------- |

2 ) शब्दसिद्धी : 2

खालील तक्ता पूर्ण करा:

उपाहार , धारदार , शिलाई , गडबड

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| | | |

3) वाक्प्रचार : 4

खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा:

१)मान देणे

२) कित्ता गिरवणे

३) धीर न सुटणे

४) ताकास तूर लागू न देणे

**प्र. 4 . आ )भाषिक घटकावर आधारित कृती :** **गुण (8 )**

**(1 )शब्दसंपत्ती**

**1)खालील शब्दाला दोन समानार्थी शब्द लिहा :** 1

i) काया [ ] [ ]

**2 )खालील शब्दांचे विरुद्ध अर्थी शब्द लिहा :** 1

i) सुबोध [ ]

ii) अवरोह [ ]

**3) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :** 1

i) महिन्यातून प्रसिद्ध होणारे – [ ]

ii )कोणतीही अपेक्षा न ठेवणारा– [ ]

**4 )खालील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** 1

सासुरवास ( सासुर व वास हे शब्द वगळून )

**(2) लेखननियमांनुसार लेखन :** 2

अचूक शब्द ओळखा (कोणतेही चार शब्द सोडविणे ):

i) सुचना /सुचणा /सूचणा /सूचना

ii) निष्पर्ण /निशपर्ण /नीष्पर्ण /निषपर्ण

iii) माहिति /माहिती /माहीती /म्हाइति

iv) कनीसठ /कनिष्ठ /कनिष्ट /कनीष्ट

v) परीक्षा /परिक्षा /परिक्शा /परिकक्षा

vi) पूरस्कार / पुरसकार् / पुरस्कार /पूरकसार

**(3) विरामचिन्हे :** 1

खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा :

i ) – [ ]

ii) , [ ]

**(3) पारिभाषिक शब्द :** 1

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :

i) Census –

ii) Index –

**विभाग –5 : उपयोजित लेखन**

**प्र. 5 .( अ )खालील कृती सोडवा :** गुण (6 )

**1)पत्रलेखन :**

पुढील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

**'चला आनंद लुटूया '**

पर्यटकांसाठी आनंदपर्वणी

**वेदनंदिनी**

**बार्शी टाकळी रोड अकोला**

**पिन ४४४००१**

प्रवेश शुल्क ३०० रुपये फक्त

**आमची वैशिष्ट्ये**

- निसर्गाचे सान्निध्य
- विविध खेळाचा मनसोक्त आनंद
- सर्वांसाठी रुचकर जेवणाची सोय
- वय वर्षे ३ पर्यंतच्या बालकांना नि:शुल्क प्रवेश
- ३ वर्षापुढील सर्वांना अत्यंत माफक शुल्क

केवळ १०० पर्यटकानाच दररोज प्रवेश मिळेल

वेळ : दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यन्त

**संपर्क :** भ्रमणध्वनी :९८७६५४३२१० e-mail: vednandini @gmail . com

एक पर्यटक या नात्याने सहलीकरिता व्यवस्थापकांना माहिती पत्रकाची मागणी करणारे पत्र लिहा.
दरात देण्यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.

किंवा

विद्यार्थी प्रतिनिधि या नात्याने संबंधित व्यक्तीला शालेय विद्यार्थ्यांसाठी सहलीसाठी प्रवेश शुल्कात सवलत मिळावी याकरिता विनंती करणारे पत्र लिहा

किंवा

**2) सारांशलेखन**

विभाग– १ गद्य (इ) [प्र.क्र . १ (इ )] मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. 5 ( आ )खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : गुण (10 )

**1)जाहिरात लेखन :**

पुढील जाहिरात वाचून त्याखालील कृती करा.


## बालदोस्तांसाठी

*मुक्ती प्रॉडक्शन निर्मित *सदाशिव पिल्ले सादर करीत आहे.

**चिऊताईचं लग्न**

**राष्ट्रपती पुरस्कार विजेते**

**एकमेव अजरामर वगनाट्य**



**लेखक :** संभाजी गायकवाड



**दिग्दर्शक :** यश चव्हाण

**ऑन लाइन बूकिंग उपलब्ध**

1 **चौकटी पूर्ण करा.** 2

नाटकाची वैशिष्ट्ये

→ [ ]

→ [ ]

2 नाटकाचे दिग्दर्शक व लेखक 1

→ ---------

→ ---------

3 **नाटकाचे नाव –** 1

4 **निर्मिती संस्था** 1

**2) बातमीलेखन :** 5

खालील विषयावर बातमीलेखन करा:

तुमच्या शाळेत आयोजित केलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे बातमी लेखन करा.

**3) कथालेखन :** 5

( पुढील शब्दांवरून कथा लेखन करा व समर्पक शीर्षक द्या )

वृद्ध व्यक्ती – छत्री – पाऊस

प्र. 5 .(इ )खालील लेखनप्रकारापैकी कोणतीही कृती सोडवा : गुण (8 )


**1 वैचारिक लेखन**

खालील दिलेल्या चौकटीतील घटकाच्या आधारे तुमचे विचार लिहा.




**2 आत्मकथन**

दिलेल्या मुद्दयांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :



3 **प्रसंगलेखन**

विद्यार्थ्यांची मनोगते

शालेय आठवणींना उजाळा

**इयत्ता १० वी**

**निरोप समारंभ**

दिनांक २० फेब्रुवारी २०२१

सकाळी १० वाजता

सरस्वती विद्यालय नाशिक

शिक्षकांची मनोगते

वरील सोहळ्यास तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.